# अनामप्रेम स्नेहवार्ता



## अनामप्रेम - मासिक वृत्तपत्रिका

## January - 2026

Scanned with OKEN Scanner






**टाटा मॅरेथॉन, मुंबई येथे अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग.**

**मुंबई येथे आयोजित टाटा मॅरेथॉनमध्ये अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदविला व मॅरेथॉन यशस्वीरित्या पूर्ण केली.**

**एक कदम और फाउंडेशन यांच्या माध्यमातून संस्थेला या प्रतिष्ठित मॅरेथॉनमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाली.**
**विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, जिद्द व चिकाटीच्या बळावर मॅरेथॉन पूर्ण करून प्रेरणादायी उदाहरण सादर केले. या सहभागामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढला तसेच राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेचा मौल्यवान अनुभव त्यांना मिळाला.**

अंध कल्याण शैक्षणिक सप्ताहात अनामप्रेमचे उल्लेखनीय यश

दि. ८ ते १२ जानेवारी २०२६ दरम्यान राष्ट्रीय दृष्टीहिन संघ, महाराष्ट्र यांच्या वतीने गडचिरोली येथे ३६ वा अंध कल्याण शैक्षणिक सप्ताह उत्साहात पार पडला. राज्यभरातील अंध शाळांमधील विद्यार्थ्यांनी विविध बौद्धिक व सांस्कृतिक स्पर्धांमध्ये सहभाग घेतला.
अनामप्रेम संस्थेच्या विद्यार्थ्यांनीही उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेचा नावलौकिक वाढविला.






Scanned with OKEN Scanner

# सामाजिक बांधिलकीतील नवे उपक्रम

नगर टाइम्स
अहिल्यानगर । सोमवार, १२ जानेवारी २०२६

## भल्या सकाळी अनामप्रेमच्या कलाविष्काराने निसर्गप्रेमी खूष...

### ट्रेकॅम्पच्या पुढाकारातून दिव्यांगांनी घेतला गर्भगिरी डोंगर परिसरात ट्रेकचा आनंद

अहिल्यानगर (प्रतिनिधी) – पहाटेची वेळ... निसर्गरम्य डोंगर परिसर... हवेत गारवा आणि कानात पडणारा वाद्यांचा निनाद अन सुमधूर भजनांचा आवाज... त्यामुळे तृप्त झालेले रसिक पर्यटनप्रेमी... निमित्त होते ट्रेकॅम्पने अनामप्रेम संस्थेच्या दृष्टीहिन विद्यार्थ्यांसह आयोजित केलेल्या गर्भगिरी महादेव मंदिर परिसरातील ट्रेकचे. अनामप्रेमच्या कलाकारांनी रंगवलेल्या संगीत मैफलीत उपस्थित अक्षरशः मंत्रमुग्ध झाले होते.

गर्भगिरी डोंगररांगेत नगरपासून सुमारे २० किलोमीटर अंतरावर गर्भगिरीचा महादेव हे पुरातन छोटेसे दगडी मंदीर आहे. ट्रेकॅम्पचे संस्थापक विशाल लाहोटी यांच्या संकल्पनेतून या वेळी या मंदिर परिसरातील टेकडीवर ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, यंदाच्या ट्रेकचे वेगळे वैशिष्ट्य होते. अंधांसाठी काम करणाऱ्या अनामप्रेम संस्थेच्या ३० दृष्टीहिन विद्यार्थ्यांना सोबत घेण्यात आले होते. भल्या पहाटे २५० निसर्गप्रेमी नगरकर व अनामप्रेमचे ३० विद्यार्थी चांदबिबी महाल घाटात पोहोचले. डोंगरावरील सपाट जागेवर सर्वांनी शारीरिक कसरती केल्या. एक वेगळीच अनुभूती मिळालेल्या अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर कमालीचा आनंद दिसत होतो. त्यानंतर ट्रेक घडवून आणण्याचे आव्हान ट्रेकॅम्पच्या सदस्यांवर होते. ते त्यांनी व्यवस्थित पार पाडले.





गर्भगिरीच्या महादेव मंदिर परिसरात पोहोचल्यानंतर सर्वांनी मनोभावे दर्शन घेतले. नंतर अनामप्रेमच्या सौदागर लोंढे, द्वारका जोरावर, श्रद्धा काटे, राधा यादव, काजल असवले, अमर सोमवंशी, प्रकाश धुंदकर, राहुल पेटारे आदी वादक-गायकांनी डॉ. मेघना मराठे, अभय रायकवाड, सुरेखा राठोड, अमृत भुसारी, राहुल खिरोडे यांच्या मार्गदर्शनाखाली मैफल चांगलीच रंगवली. त्यांनी तबला, पेटी, खंजिरी, चायना ब्लॉक, टाळ या वाद्यांच्या साथीने सुमधूर भजने सादर केली. या कलाविष्काराने मंत्रमुग्ध झालेल्या रसिकांनी टाळ्यांच्या गजरात त्याचे स्वागत केले. राहुल पेटारे या विद्यार्थ्याने एका हाताने टाळी वाजवून दाखविली. त्यामुळे उपस्थित सर्वचजण अचंबित झाले. राजू भगत यांनी संस्थेची माहिती दिली. अनामप्रेमच्या विद्यार्थिनींचे हेअर कट मोफत करून देण्याची इच्छा ट्रेकॅम्पच्या सदस्या शितल दळवी यांनी या वेळी व्यक्त केली. स्वादिष्ट भेळ आणि गरम कॉफीचा आस्वाद घेतल्यानंतर या विद्यार्थ्यांना व्यवस्थित गाडीपर्यंत सोडण्यात आले. या दिव्यांगांना ट्रेक घडवून आणल्याचे समाधान अनेक ट्रेकरच्या चेहऱ्यावर होते, तर काहीजणांच्या डोळ्यात सहानुभूतीचे अश्रू होते. एका वेगळ्या ट्रेकचा अनुभव सर्वांनी घेतला.

### ट्रेकर बनले 'त्यांचे' डोळे...

- ट्रेकला आलेल्या अनामप्रेमच्या प्रत्येक विद्यार्थ्याची जबाबदारी एका-एका ट्रेकरने घेतली. त्यांना व्यवस्थित हाताला धरून डोंगरावरील भटकंती सुरू झाली. आपल्या आजूबाजूला डोंगर आहे, एकीकडे दरी आहे, पवनचक्की आहे, गवत वाळलेले आहे असे विविध वर्णन विद्यार्थ्यांना ऐकवले जात होते. जणू ट्रेकर त्या विद्यार्थ्यांचे डोळेच बनले होते. त्यामुळे निसर्गाचा परिपूर्ण आनंद या विद्यार्थ्यांनी घेतला.









जैन साध्वींची अनामप्रेम हिंमतभवन प्रकल्पास भेट.

जैन साध्वी यांनी अनामप्रेम हिंमतभवन प्रकल्पास प्रेमपूर्वक भेट दिली. त्यांच्या या भेटीदरम्यान त्यांनी विद्यार्थ्यांशी आत्मीयतेने संवाद साधला. त्यांनी मुलांसाठी सुंदर गाणी म्हटली व प्रेरणादायी गोष्टी सांगितल्या. तसेच विद्यार्थ्यांनीही आनंदाने आपली गाणी सादर केली, ज्यामुळे वातावरण अत्यंत उत्साही व आनंदमय झाले.

Scanned with OKEN Scanner



## अनामप्रेम संस्थेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

अहिल्यानगर येथील अनामप्रेम संस्था, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक येथे २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उत्साही सहभागात साजरा करण्यात आला. ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत व राज्यगीत सादर करण्यात आले.

प्रमुख अतिथी कॅप्टन (नि.) बशीर शेख तसेच मान्यवरांच्या उपस्थितीत दिव्यांग विद्यार्थ्यांचा सन्मान व साहित्य वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या स्वागतगीताने कार्यक्रमाची शोभा वाढवली. संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने यांनी पाहुण्यांचा परिचय करून देत कार्यक्रमाची सांगता प्रेरणादायी संदेशाने केली.



## अनामप्रेम संस्थेस मुंबई ग्राहक पंचायतची सदिच्छा भेट

दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी अनामप्रेम संस्था, अहिल्यानगर येथील ‘सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प’, निंबळक येथे मुंबई ग्राहक पंचायत, ठाणे विभागातील १७ सदस्यांनी सदिच्छा भेट दिली. सामाजिक संस्थांच्या उत्पादनांना मुंबईत विक्रीची संधी उपलब्ध करून देणाऱ्या या मान्यवरांनी संस्थेच्या कार्याची पाहणी केली.

यावेळी डॉ. मेघना मराठे यांनी अनामप्रेमच्या उद्दिष्टांबाबत तसेच दिव्यांग मुलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती देत संवाद साधला.

Scanned with OKEN Scanner







**अनामप्रेमच्या गौरांग अभिनव शाळेत थोर महापुरुषांच्या जयंती उत्साहात साजऱ्या करण्यात आल्या.**
**विद्यार्थ्यांनी भाषणे, गीत व सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे त्यांच्या कार्याला अभिवादन केले.**
**या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये देशभक्ती, सामाजिक जाणीव व प्रेरणादायी विचारांची जागृती करण्यात आली.**



दैनिक

# रयत समाचार

2_CITY PAGE
21 Jan 2026

## ‘नगारा’ संगीत महोत्सवास उत्स्फूर्त प्रतिसाद

### पं. नागेश आडगावकर यांच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

अहमदनगर | रयत समाचार

अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संचलित न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयात आयोजित ‘नगारा’ संगीत महोत्सवाला महाराष्ट्रभरातून कलाकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सोमवारी ता. १९ जानेवारी रोजी राज्यस्तरीय देशभक्तीपर समूहगीत गायन स्पर्धा व राज्यस्तरीय अभंग गायन स्पर्धा (वैयक्तिक) पार पडल्या. अभंग गायन स्पर्धेत रूपक कुलकर्णी (पुणे) याने प्रथम, श्रेया गाडवे (पुणे) द्वितीय, शाल्मली भालेराव (अहिल्यानगर) तृतीय, दामिनी देवडे (छ. संभाजीनगर) उत्तेजनार्थ, गौरी इंगळे (अहिल्यानगर) विशेष पारितोषिक मिळविले. देशभक्तीपर समूहगीत स्पर्धेत परिक्रमा पब्लिक स्कूल (काष्टी, श्रीगोंदा) प्रथम, दि. आयकॉन पब्लिक स्कूल (नगर) द्वितीय, अनामप्रेम संस्था (अहिल्यानगर) तृतीय, विठ्ठल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय (माहिजळगाव) उत्तेजनार्थ, जि.प. प्राथमिक शाळा गोंडेगाव (श्रीरामपूर) विशेष पारितोषिक विजेते ठरले. पारितोषिक वितरण समारंभास संस्थेचे अध्यक्ष रा.ह. दरे अध्यक्षस्थानी होते. खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सदस्या निमाताई काटे, प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे, संचालक डॉ. बी.एच. झावरे उपस्थित होते. परीक्षण डॉ. नीरज करंदीकर, वर्षा पंडित, शुभांगी मांडे, हर्षद भावे यांनी केले.

सायंकाळी ६ वाजता पं. नागेश आडगावकर यांची मैफल झाली. त्यांनी ‘राग नंद’, किरवाणीतील “क्या जादू डारा दिवाना” ठुमरी तसेच “पेई पेई माझे वाचे”, “समचरणी सादर व्हावे”, “आकल्प आयुष्य व्हावे तया कुळा” हे अभंग सादर केले. तबल्यावर रोहन पंढरपूरकर, संवादिनीवर स्वानंद कुलकर्णी, पखवाजवर रोहित खवळे, व्हायोलीनवर मंजुला फुकान, स्वरसाथ प्रफुल्ल सोनकांबळे व प्रा. योगेश अनारसे यांनी साथसंगत केली. सूत्रसंचालन प्रा. ढोकणे यांनी केले. आभार प्रा. आदेश चव्हाण यांनी मानले. आयोजनासाठी डॉ. संजय कळमकर, डॉ. अनिल आठरे, प्रबंधक बबन साबळे यांचे मार्गदर्शन लाभले. प्रा. आदेश चव्हाण, प्रा. अभिजीत अपस्तंभ, प्रा. योगेश अनारसे, प्रा. कल्याण मुरकुटे, समिती सदस्य व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

“नगारा संगीत महोत्सव २०२६” मध्ये अनामप्रेमचे यश

न्यू आर्ट्स कॉलेज आयोजित “नगारा संगीत महोत्सव २०२६ (पर्व ७)” मध्ये अनामप्रेम टीमने राज्यस्तरीय समूह गायन (देशभक्तीपर) स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले. तसेच राज्यस्तरीय अभंग गायन स्पर्धेत संस्थेची विद्यार्थिनी कु. गौरी इंगळे हिला उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त झाला.

Scanned with OKEN Scanner

# सेवाकार्याच्या प्रवासातील क्षण





अनामप्रेम – हिंमतभवन प्रकल्पास सदिच्छा भेट

अनामप्रेमच्या हिंमतभवन प्रकल्पास Orbiz कंपनीच्या CSR प्रमुख मा. संध्या थडाणी मॅडम यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी त्यांनी प्रकल्पाची सविस्तर माहिती घेत विद्यार्थ्यांशी हितगुज साधले व त्यांच्या प्रगतीबाबत जाणून घेत प्रोत्साहन दिले.









अनामप्रेम, गांधी मैदान येथे Community Eye Care Foundation व Dr Gogate Eye Clinic यांच्या संयुक्त विद्यमाने अंध विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या उपक्रमातून विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत तज्ज्ञ डॉक्टरांनी मार्गदर्शन केले.


विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा आरोग्यसेवा उपक्रमांचा मोठा आधार ठरत आहे.

Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम - जानेवारी - 26 वसतिगृहनिहाय विद्यार्थी संख्या




हिंमतभवन वसतिगृह — लाभार्थी 63



गौरांग वसतिगृह — लाभार्थी 21



सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प — लाभार्थी 98



यशवंत प्रकल्प आधारग्राम — लाभार्थी 6




अनामप्रेम पुणे वसतिगृह — लाभार्थी 14



मराठवाडा वसतिगृह — लाभार्थी 13



## अनामप्रेम संचालित प्रकल्पातील एकूण लाभार्थी संख्या 215




## जागतिक दिव्यांग दिनानिमित्त श्री. सुहास अंतरकर अनामप्रेम हिंमतभवन वस्तीगृहातील सर्व दिव्यांग मुलांना ब्लँकेट चे वाटप..



**अनामप्रेम संस्थेत श्री. प्रमोद घोडके सर यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला.**
**या प्रसंगी भास्कर पाटील (शिक्षणाधिकारी, अहिल्यानगर) यांनी संस्थेस भेट देऊन शुभेच्छा दिल्या. तसेच वाढदिवसानिमित्त आजचे अन्नदान श्री. प्रमोद घोडके सर यांच्या वतीने करण्यात आले.**

त्रिशा गणेश नय्यर हिच्या वाढदिवसानिमित्त नय्यर परिवाराने अनामप्रेम संस्थेत येऊन आनंद साजरा करत संगीत टीमसाठी आवश्यक ढोलकीची मदत केली.




Scanned with OKEN Scanner










अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी त्यांच्या कौशल्यपूर्ण हातांनी तयार केलेल्या विविध आकर्षक वस्तूंचे विक्री स्टॉल अहमदनगर,पुणे आणि मुंबई यांसारख्या शहरांतील प्रदर्शनांमध्ये उत्साहात लावण्यात आले.

**“अनामप्रेम संस्थेच्या विविध प्रकल्पांमध्ये दुरुस्तीची कामे, सोलर ऊर्जा प्रकल्पांची उभारणी तसेच आवश्यक बांधकामे यशस्वीरित्या पूर्ण होत असून, आत्मनिर्भरतेच्या दिशेने संस्थेची वाटचाल अधिक भक्कम होत आहे.”**














Scanned with OKEN Scanner

# अनामप्रेम मराठवाडा वसतीगृहातील अपडेट.



अनामप्रेम - मराठवाडा प्रकल्प, छत्रपती संभाजीनगर येथे श्री. राजीव गुजर यांनी संस्थेला सदिच्छा भेट दिली.
मुलांशी मनमोकळा संवाद साधत त्यांनी स्थानिक प्रकल्पाची सविस्तर माहिती घेतली, हॉस्टेलला भेट देऊन नव्याने घेतलेल्या प्लॉटचे निरीक्षण केले व पुढील वाटचालीसाठी मौलिक मार्गदर्शन केले.

## अन्नदान – कृतज्ञ स्मरणातून सेवाभाव

श्रीमती श्रुती आनंद दरक यांनी आपल्या पती स्व. आनंद दरक यांच्या जयंतीनिमित्त संस्थेला सदिच्छा भेट दिली. त्यांनी मुलांसाठी स्वादिष्ट नाष्टा आणले, तसेच आवश्यक किराणा साहित्यही प्रदान केले.
त्यांच्यासोबत श्रीमती सुनंदा सुभाष दरक, श्री तुषार सुभाष दरक व पल्लवी तुषार दरक उपस्थित होते. आपल्या परिचयातील दात्यांकडून संस्थेची माहिती मिळाल्यानंतर त्यांनी प्रथमच भेट देत सेवाभावाची सुंदर परंपरा जपली.





संस्थेच्या कार्याची दखल घेत आज सौ. अमृता मयूर धूत यांनी संस्थेला भेट देऊन देणगी प्रदान केली. समाजाभिमुख उपक्रमांना बळ देण्याच्या उद्देशाने त्यांनी ही मदत केली.
त्या Giants Group च्या सदस्य असून, लवकरच त्यांच्या समूहाची संस्था भेट आयोजित करण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

# प्रगती कैलास मिसाळ – जिद्दीची, विश्वासाची आणि नवजीवनाची कहाणी



“कधी आयुष्य गोड झोप देतं, कधी दु:खाचं वादळ उठवतं; पण जो संकटांतही खंबीर उभा राहतो, तोच खऱ्या अर्थाने जीवन जगतो.”

जन्म आणि कुटुंब पार्श्वभूमी

जालना जिल्ह्यातील भोकरदन तालुक्यातील रेलगाव या छोट्याशा खेड्यात २९ ऑक्टोबर २०११ रोजी प्रगतीचा जन्म झाला. आई सुगंधा आणि वडील कैलास मिसाळ यांच्या साध्या, शेतीवर चालणाऱ्या संसारात ती आनंदाचा किरण बनून आली. एका मुलगा आणि एका मुलगी—अशा दोन अपत्यांसह त्यांचा संसार सुखाने नांदत होता.

शिक्षणाची उज्ज्वल सुरुवात

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भैरवनाथवाडी येथे प्रगतीने इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत शिक्षण घेतले. ती हुशार, हसतमुख आणि नेहमी वर्गात अव्वल क्रमांक पटकावणारी विद्यार्थीनी होती. शिक्षकांची लाडकी आणि मित्रमैत्रिणींची आवडती — अशी तिची ओळख होती.

नियतीचा कठोर आघात

सन २०२२ मध्ये, पाचवीत शिकत असताना, शाळेतच तिला अचानक चक्कर आली आणि ती कोसळली. गावातील क्लिनिकमधून तिला तातडीने न्यूरोसर्जनकडे नेण्यात आले. मानेतील नस दाबली गेल्यामुळे शस्त्रक्रिया करणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

संभाजीनगर येथील MGM Hospital येथे तिचे पहिले ऑपरेशन झाले; परंतु गुंतागुंतीमुळे तिच्या मज्जातंतूला कायमस्वरूपी इजा झाली आणि ती शारीरिकदृष्ट्या अपंग झाली. धावणारी, खेळणारी प्रगती अंथरुणाला खिळून राहिली.

आईच्या डोळ्यांत अश्रू, वडिलांच्या मनात वेदना — पण त्यांनी हार मानली नाही. पुढील उपचारांसाठी मुंबईतील KEM Hospital येथे पुन्हा शस्त्रक्रिया करण्यात आली. तरीही अपेक्षित सुधारणा झाली नाही. तिची प्रकृती नाजूक असल्याने पुढील उपचारांसाठी वेळ आवश्यक असल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

Scanned with OKEN Scanner

पुनर्वसनाचा कठीण पण आशादायी प्रवास
“जिथे वैद्यक हरले, तिथे विश्वास जिंकला.”
पुण्यातील थेरेपी सेंटरमध्ये तीन महिने फिजिओथेरपी झाली. थोडी सुधारणा दिसू लागली; आशेचा किरण डोकावला. परंतु नियतीने पुन्हा एकदा परीक्षा घेतली — व्हीलचेअरवरून पडल्याने ती पुन्हा अंथरुणावर खिळली.

आशेचा दीप — अनामप्रेम संस्था
एप्रिल २०२५ मध्ये प्रगतीला अनामप्रेम संस्थेच्या स्पायनल कॉर्ड इंज्युरी सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. येथे तिला केवळ वैद्यकीय उपचार नव्हे, तर मानसिक आधार, मोफत नियमित फिजिओथेरपी, निवास व आहाराची सुविधा, तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि सर्वात महत्त्वाचे — आपलेपणाचा स्पर्श मिळाला.

शांत, निसर्गरम्य वातावरणात तिला घरच्यासारखी ऊब मिळाली. जेव्हा ती येथे आली, तेव्हा ती स्वतःची कोणतीही कामे करू शकत नव्हती; पण आज ती तिची दैनंदिन कामे स्वबळावर करते. तिच्यात आत्मविश्वास आणि नवचैतन्य निर्माण झाले आहे.

प्रगतीचे मनोगत “महागड्या उपचारांची ऐपत नसलेल्या आम्हा गरिबांसाठी अनामप्रेम संस्था म्हणजे आधारवड आहे. माझ्यासारख्या अनेक ‘प्रगतींना’ ही संस्था उभं करते, जगण्याचा नवा मार्ग दाखवते. मला खूप काही शिकायचं आहे, स्वतःच्या पायावर उभं राहायचं आहे. माझ्या या स्वप्नांना पंख देण्याचं कार्य संस्थेने केलं आहे. त्यांच्या निस्वार्थ सेवेत मला ईश्वराचेच रूप दिसते."

आजची प्रगती
आजही प्रगती उपचार घेत आहे; परंतु तिचं मन कधीच खचलेलं नाही. ती इतरांना प्रेरणा देते —

“देह अपंग झाला तरी मन अपंग होत नाही; जिद्द असेल तर पर्वतही वाकतो."

खरोखरच, तिचं नाव तिच्या आयुष्याशी साजेसं आहे.
दु:खाच्या सावटातही ती ‘प्रगती’ करतच आहे — जिद्दीने, विश्वासाने आणि नव्या उमेदीने.





Scanned with OKEN Scanner

## संस्थेतील दिव्यांग बांधवांच्या कौशल्यातून बनवण्यात आलेल्या दर्जेदार वस्तू

# अनामप्रेम कौशल्य विकासालय अंतर्गत कौशल्य निर्मिती



हवाई चप्पल, क्रॉक्स

दिव्यांग निर्मित उत्पादने खरेदी करुन त्यांना रोजगारक्षम बनवा.

नॅपकिन बुके, सॅनिटरी पॅड

**संपर्क - अनामप्रेम, गांधी मैदान, अहिल्यानगर 9011918786/7350013805**



मुख्य ऑफिस (गांधी मैदान) : 9011004576, 9422054956
सत्यमेव जयते ग्राम (निंबळक) : 7350517778, 7350013805
यशवंत प्रकल्प (इसळक) : 9011918786, 9422307116

कौशल्य विकास केंद्र, निंबळक : 9011918786, 8788548677
पुणे प्रकल्प : 9011750022, 9372404963
छ.संभाजीनगर प्रकल्प : 9011750035, 9921509199

## देणगी देण्याकरीता बँक तपशिल

| Bank Name | State Bank Of India |
| --- | --- |
| Name Of Account | ANAMPREM |
| Branch | Kalyan road ( SME ),<br>Ahilyanagar (Ahmednagar) |
| Account No | 32144934687 |
| Account Type | Current |
| IFSC Code | SBIN0014794 |

आपण देणगी ऑनलाईन जमा केल्यावर पावतीसाठी आपले नाव, पॅन नंबर, पत्ता, मेल आयडी व फोन नंबर ही माहिती संस्थेला anampreminfo@gmail.com या मेल वर अथवा 9011004576 या संपर्क क्रमांकावर कळवावे.

Scanned with OKEN Scanner